ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीतील डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान



विनोद किसन आखाडे
संशोधक विद्यार्थी , सामाजिकशास्त्र संकुल ,
पु. अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर .

प्रा.डॉ.संजय गायकवाड
मार्गदर्शक , मा.ह.महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय मोडनिंब.

**ABSTRACT**

भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मूलभूत, व्यापक आणि क्रांतिकारक स्वरूपाचे आहे. त्यांनी स्त्रीमुक्तीचा प्रश्न केवळ सामाजिक सुधारणेचा न मानता, तो सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांचा अविभाज्य भाग म्हणून मांडला. जात, वर्ग आणि लिंग यांच्या परस्परसंबंधातून स्त्रीवर होणाऱ्या दुहेरी शोषणाची त्यांनी सखोल चिकित्सा केली. भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीला वैचारिक, कायदेशीर आणि संविधानिक अधिष्ठान देणारे नेतृत्व म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**KEY WORDS :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर, , स्त्रीहक्क, पितृसत्ता, हिंदू कोड बिल, संविधान, आंबेडकरवादी स्त्रीवाद,

## संशोधनाचा उद्देश

**सदर संशोधन लेखाचे प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत**

1) भारतातील सर्व जाती आणि धर्मांच्या महिलांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
2) भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीला वैचारिक, कायदेशीर आणि संविधानिक अधिष्ठान देणारे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर
3) बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या दास्याचे आणि अवनतीचे मूळ शोधून काढले याचा अभ्यास करणे
4) जातीची जडण घडण आणि स्त्रियांचे शोषण एकमेकांशी पूरक असल्याची सैद्धांतिक मांडणी अभ्यास करणे

## संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.
प्राथमिक स्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ, दुय्यम स्रोत आंबेडकरांवरील संशोधन ग्रंथ, स्त्रीवाद विषयक पुस्तके व शोधनिबंध, सामाजिक न्याय व स्त्रीअभ्यास विषयक लेख

## विश्लेषण : भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीतील आंबेडकरांचेयोगदान

### प्रस्तावना

स्त्री ही माणूस आहे. ती मानवी समाजाचा अविभाज्य असा घटक आहे. या घटकाची दुर्दशा करून कोणत्याही मानवी समाजाला स्वतःचा सुसंस्कृतपणा साबीत करता येत नाही. स्वतःचे अर्धांग लुळे करून आणि ठेवून कोणत्याही समाजाला आपला निरोगीपणा सिद्ध करता येत नाही. स्त्रीला तो तो समाज काय मानतो, तिला कसे आणि कोणते स्थान देतो या प्रश्नांच्या उत्तरांवरून त्या त्या समाजाचा दर्जा आणि मानवी समाज म्हणून त्याची मूल्यवत्ता ठरविला येते. स्त्रीला केवळ भोगदासी करून ठेवणारा, तिला केवळ जातींची निर्मिती करणारी यंत्रणा म्हणून राबवणारा आणि तिला ज्ञानबंदी करून माणुसकीच्या पूर्ण आविष्काराकडे जाणाऱ्या तिच्या वाटा बंद करून टाकणारा समाज मानवी समाज म्हणवून घेण्याची लायकी गमावून बसत असतो. त्या समाजाची संस्कृती प्रश्नार्थक होऊन जात असते.

स्त्री, शूद्र आणि अतिशूद्र या सर्वांच्या मानवी अस्मितेला जाळणारा मनुस्मृती हा ग्रंथ बाबासाहेबांनी जाळला आणि क्रांतीसाठी संग्राम सुरू केला. स्त्रीला तिच्या गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी तिच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. तिला स्वाभिमानाने जगता यावे, आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असावे, पत्नी ही पुरुषाची समान अधिकारी असावी. ती पतीची गुलाम असू नये, यासाठी स्त्रीने स्वतःचा न्यूनगंड नष्ट करून ज्ञान मिळविणे कसे गरजेचे आहे हे डॉ. आंबेडकरांनी सांगितले, वेश्या आणि मुरळयांनाही त्यांनी इज्जतीचे आणि चारित्र्याचे धडे दिले. स्त्री ही समाजाला अलंकार वाटली पाहिजे असे तिच्या शीलाचे मर्म आंबेडकरांनी समजावून सांगितले. बाळंतपणाच्या यातनांमधून स्त्रीची सुटका व्हावी यासाठी त्यांनी कुटुंबनियोजनाचे महत्त्व सांगितले. तिला स्वास्थ्य लाभावे, समाजक्रांतीच्या कार्यासाठी तिला वेळ मिळावा. तिला साहित्यादी ललित कलांची निर्मिती करता यावी. बौद्धिक विकासासाठी तिला पुरेसा वेळ मिळावा. तिला चूल आणि मूल यातच संपून जावे लागू नये, यासाठी कुटुंबनियोजनाचा आग्रह डॉ. आंबेडकरांनी धरला होता. गिरण्या, कारखाने, खाणी यातून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, बाळंतपणासाठी रजा मिळावी, कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावीत या सुधारणा आंबेडकरांनीभारताचे मजूर मंत्री असताना केल्या. स्त्रीने धर्ममानव, जातीमानव जन्माला घालू नये. बालविवाह, सतीप्रथा, पुनर्विवाहबंदी या गोष्टी तिच्यावर लादल्या गेल्या. हे अन्याय तिने जाळून टाकले पाहिजेत. जातीनिर्मूलनाच्या आणि स्त्रीमुक्तीच्या लढ्यात स्त्री पुढे असावी. समाजक्रांतीच्या प्रक्रियेत स्त्रीची भूमिका निर्णायक आहे असे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे आहे. स्त्रीने नवऱ्याची गुलाम होऊन राहू नये. पतीच्या बरोबरीने आणि समानतेच्या नात्याने ती उभी राहायला हवी. स्त्रियांनी धीट, बुद्धिमान आणि भीतीमुक्त असले पाहिजे. तिने कायम परिवर्तनशील असले पाहिजे. मनूने आणि खलधर्मांनी तिच्यावर लादलेल्या महामृत्यूतून तिने स्वतःला स्वतःच्या तेजःपुंज कर्तृत्वाने मुक्त करून घेतले पाहिजे.

डॉ. आंबेडकरांनी सभांमधून, परिषदांमधून आणि लेखनातून स्त्रीमुक्तीचा मूलगामी विचार मांडला. स्त्रीच्या समान अधिकाराची मांडणी केली. भारतीय संविधानाचे शिल्पकार या नात्याने त्यांनी तिच्या समतेला आणि मुक्तीला कायद्याचे रूप दिले. एक व्यक्ती-एक मत एवढेच नाही तर एक व्यक्ती - एक मूल्य ही क्रांतिकारी तरतूद करून ठेवली, त्यांनी हे सर्व करून स्त्रियांसकट येथील सर्वच शोषितांच्या हातात क्रांतीची तरफ दिली. संविधानाच्या चौदाव्या कलमाने सर्व व्यक्तींना कायदेशीर समता दिली. पंधराव्या कलमाने तर स्त्री-पुरुष हा भेदच नष्ट करून टाकला. या तरतुदींमुळे स्त्रीला आणि येथील इतरही सर्वच अन्यायग्रस्तांना मनुष्यत्व नाकारणारा धर्म आणि त्याच्या परंपरा मोडीत निघाल्या .

स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्रीला केवळ कायदेशीर हक्क मिळणे नव्हे, तर तिला व्यक्ती म्हणून स्वातंत्र्य, समानता, प्रतिष्ठा आणि निर्णयक्षमता प्राप्त होणे होय. शिक्षण, रोजगार, विवाह, मालमत्ता, राजकीय सहभाग आणि सुरक्षितता या सर्व क्षेत्रांत स्त्रीला समान संधी मिळणे म्हणजे स्त्रीमुक्ती.

भारतीय संविधानाने स्त्रीमुक्तीसाठी ठोस आणि व्यापक चौकट उपलब्ध करून दिली आहे. संविधानातील विविध तरतुदी स्त्री–पुरुष समानतेचा स्पष्ट पुरस्कार करतात.

कलम १४: कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण. महिलांना स्वातंत्र्य नाकारण्यात आले होते आणि त्यांना स्वातंत्र्याच्या पात्रतेचे नसल्याचे सांगण्यात आले होते. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानाच्या कलम १४ नुसार, देशातील सर्व महिला आणि पुरुष कायद्याने समान होते आणि त्यांना स्वातंत्र्य उपभोगण्याचा समान अधिकार देण्यात आला होता. इतकेच नाही तर संविधानाच्या कलम ३१ (ड) नुसार, महिला आणि पुरुष दोघांनाही समान कामासाठी समान वेतनाचा अधिकार देण्यात आला होता

कुटुंबातील कोणत्याही महिलेला व्यवहारांबाबत स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाच्या कलम १४ नुसार, महिला आणि पुरुषांना समान अधिकार असल्याने, महिलांना व्यवहारांबाबत स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

कलम १५: धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव करण्यास मनाई.

धर्मग्रंथानुसार चार वर्णातील लोकांना सरकारी नोकरी मिळविण्याचा समान अधिकार नाही. शुद्र व्यक्ती न्यायधिश बनू शकत नाही व ब्राम्हणां शिवायशिक्षकीपेशा कोणीही करु शकत नाही.स्त्रियांना तर नाहीच नाही मात्र कलम १६: रोजगाराच्या बाबतीत संधीची समानता. संविधानाच्या कलम ३९ (अ) नुसार, त्यांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. ब्राम्हणी मनुस्मृती नुसार ब्राम्हणां शिवायअन्य कोणालाही स्वातंत्र्य नाही, व्यवसाय करण्याचेही स्वातंत्र्य नाही. प्रत्येकाचे व्यवसाय ठरलेले, ब्राम्हण शिक्षण घेणार, यज्ञ करणार, क्षत्रियांनी राजकारभार करावा, वैश्यांनी व्यापार करावे. आणि शुद्रांनीया सर्वांची सेवा करावी.

कलम१९ नुसार  बाबासाहेब आंबेडकर लिखीत भारतीय संविधानानुसार सर्व नागरिकांना सर्व प्रकारची स्वातंत्र्ये बहाल केली आहेत. त्यामध्ये भाषण व अभिव्यक्ती, भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा, रहाण्याचा व स्थायिक होण्याचा तसेच कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय करण्याचा हक्क असेल.

कलम २१: जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार, ज्याचा अर्थ न्यायालयाने सन्मानाने जगण्याचा अधिकार समाविष्ट करण्यासाठी लावला आहे.

कलम २५ स्त्रीला अशुभ घोषित करण्यात आले आहे आणि ती धार्मिक विधी किंवा मंत्र म्हणू शकत नाही. जर ती मंत्र म्हणते तर ती नरकात जाते. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानाच्या कलम २५ नुसार, पुरुष आणि महिलांना धर्म स्वातंत्र्य आणि धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्याचे समान अधिकार आहेत.

कलम २९ मनुस्मृतीनुसार, महिलांना वेदांचा अभ्यास करण्याचा आणि ज्ञान मिळवण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता. इतकेच नाही तर, अपस्तंभ धर्मसूत्रानुसार, जर एखादा विद्यार्थी वेद वाचत असेल आणि त्याच्या समोर एक महिला येत असेल तर त्याने वेद वाचणे थांबवावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या कलम २९ नुसार प्रत्येक महिलेला शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला.

### स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने संविधानाचे महत्त्व

भारतीय संविधानाने स्त्रीमुक्तीला कायदेशीर अधिष्ठान दिले आहे. स्त्रीविषयक अन्यायाविरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार संविधानानेच दिला आहे. त्यामुळे स्त्रीमुक्तीची चळवळ केवळ सामाजिक न राहता कायदेशीर स्वरूपाची झाली.

### संशोधनाचे महत्त्व (Significance of the Study)

1. आंबेडकरवादी स्त्रीवादाचा अभ्यास करण्यास उपयुक्त.
2. दलित व वंचित स्त्रियांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवणारा दृष्टिकोन स्पष्ट होतो.
3. भारतीय स्त्री चळवळीच्या इतिहासात आंबेडकरांचे योगदान अधोरेखित होते.
4. समकालीन स्त्री धोरणे व कायदे समजून घेण्यासाठी वैचारिक चौकट मिळते

### संशोधनाच्या मर्यादा

- अभ्यास ग्रंथ व उपलब्ध दस्तऐवजांवर आधारित आहे.
- प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण या संशोधनात समाविष्ट नाही

### मूल्यमापन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयक विचार हे भारतीय समाजासाठी क्रांतिकारक ठरले. तत्कालीन सामाजिक परिस्थितीत त्यांनी मांडलेले विचार प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणारे होते. हिंदू कोड बिलाला झालेला विरोध हे त्याचे जिवंत उदाहरण

आहे.तथापि, त्यांच्या अनेक सुधारणा त्यांच्या हयातीत पूर्णतः अंमलात येऊ शकल्या नाहीत. तरीही भारतीय संविधानातील स्त्रीहक्कविषयक तरतुदी त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब आहेत. आजच्या स्त्री चळवळींसाठी आंबेडकरांचे विचार सैद्धांतिक आणि व्यावहारिक मार्गदर्शन करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणविषयक तत्त्वज्ञान हे भारतीय सामाजिक परिवर्तनाचा मजबूत पाया आहे. त्यांनी स्त्रीला केवळ कुटुंबाचा घटक न मानता, समाजाच्या पुनर्रचनेतील सक्रिय घटक म्हणून ओळख दिली. शिक्षण, कायदा आणि सामाजिक चळवळ यांच्या माध्यमातून स्त्रीसक्षमीकरण शक्य आहे, हा संदेश त्यांनी दिला.

आजही स्त्री असमानतेच्या समस्यांवर उपाय शोधताना आंबेडकरांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

## संदर्भग्रंथ

1. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब. *लेखन व भाषणे*, खंड १–१७, महाराष्ट्र शासन.
2. फुले आंबेडकरी त्री चळवळी; मीनाक्षी मून
3. आम्ही ही इतिहास घडविला आहे ; उर्मिला पवार
4. फुले आंबेडकरी स्त्री चळवळ ; डॉ ज्योती लांजेवार
5. स्त्री अभ्यास चर्चाविश्व एक आकलन डॉ चेतना सोनकांबळे
6. भारतीय नारी के उद्धारक बाबासाहेब डॉ बी आर आंबेडकर : डॉ कुसुम मेघवाल
7. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री मुक्तीचे युध्द : यशवंत मनोहर